क्र. २ /२०१८-२०१९ हस्ते बटवडा

(1)

मुंबई विद्यापीठ

सूचना

क्र.का.प्रा.वि./आयसीएन/२०१८-१९/२१९ दि.९ ऑगस्ट, २०१८

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार, दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी **दुपारी २.०० वाजता** सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते:-

| | | |
|---|---|---|
| १. प्रा. सुहास रघुनाथ पेडणेकर (कुलगुरू) | — | अध्यक्ष |
| २. डॉ. रविंद्र दत्तात्रय कुलकर्णी (प्र.कुलगुरू) | — | सदस्य |
| ३. श्री. दिपककुमार मुकादम | — | सदस्य |
| ४. प्रा. (डॉ.) मुरलीधर कु-हाडे | — | सदस्य |
| ५. डॉ. रश्मी ओझा | — | सदस्य |
| ६. प्रा. (डॉ.) गौतम गवळी | — | सदस्य |
| ७. डॉ. दिनेश कांबळे, कुलसचिव | — | सदस्य सचिव |
| ८. श्री. संजय शहा, वित्त व लेखा अधिकारी | — | निमंत्रित |

**स्वागत:—** कुलसचिवांनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले. अतिवृष्टी असताना देखील सन्माननीय सदस्य बैठकीला उपस्थित राहिल्याबद्दल कुलसचिवांनी सर्वांचे आभार मानले.

**अभिनंदन :-** कुलसचिवांनी डॉ. रविंद्र दत्तात्रय कुलकर्णी, प्र.कुलगुरू आणि श्री. संजय शहा, वित्त व लेखा अधिकारी यांची विद्यापीठात नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले व त्यांचे विद्यापीठाला अत्यंत चांगल्या प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य लाभेल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्र.कुलगुरू व वित्त व लेखा अधिकारी यांचे सर्व सदस्यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन व हार्दिक स्वागत केले.

मा. कुलसचिवांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी निवडणुकीची प्रक्रिया अत्यंत उत्कृष्ट पध्दतीने राबविल्याबद्दल व्यवस्थापन परिषदेच्या सर्व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

R / VC

26.9.18

Scanned by CamScanner

श्रध्दांजली :—

**श्रीमती गीता कपूर**

ज्येष्ठ अभिनेत्री गीता कपूर यांचे वृध्दापकळाने दिनांक २७ मे, २०१८ रोजी निधन झाले.

**श्री. पांडुरंग फुंडकर**

कृषीमंत्री श्री. पांडुरंग फुंडकर यांचे हृदयविकाराने दिनांक १ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

**श्री दादाजी खोब्रागडे**

तांदळाच्या नऊ जातींचे जनक श्री दादाजी खोब्रागडे यांचे दिनांक ४ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते.

**डॉ. कमलाकर देसाई**

डॉ. कमलाकर देसाई यांचे वृध्दापकळाने दिनांक ४ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**माजी खासदार श्री शांताराम नाईक**

माजी खासदार श्री शांताराम नाईक यांचे हृदयविकाराने दिनांक १० जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते.

**श्री श्याम म्हात्रे**

कामगार नेते आणि अखिल आग्री समाज परिषदेचे अध्यक्ष श्री श्याम म्हात्रे यांचे दिनांक १० जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६४ वर्षांचे होते.

**श्री शांताराम दातार**

मराठी भाषा संवर्धन चळवळीचे नेते श्री शांताराम दातार यांचे दिनांक ११ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

**श्री दा. गो. देशपांडे**

ज्येष्ठ साहित्यिक श्री दा. गो. देशपांडे यांचे वृध्दापकळाने दिनांक १८ जून, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

Scanned by CamScanner

बाब क्र.१ दिनांक २३ मे, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दिनांक २३ मे, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे ठराव खालील दुरूस्तीसह मंजूर करण्यात आले.
पान क्र. ३ मधील बाब क्र. १६ च्या मुद्दा क्र. २ मधील वसुलीच्या अनुषंगाने मेसर्स जाधव ॲन्ड कंपनीला "अंशत:" च्या ऐवजी प्रथम हप्त्यात "१०%" मोबदला देण्यात यावा, असे ठरले.

**बाब क्र.३ शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ करिता पंचवार्षिक बृहत आराखडा व शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता वार्षिक आराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ विचारार्थ सादर.**

ठराव : The plan was presented before August House by Prin. Kurhade, I/c Dean, Faculties of Humanities.

असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०७ नुसार अधिष्ठाता मंडळाने दिनांक २ जुलै, २०१८ च्या बैठकीत बाब क्र.२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ करिता तयार केलेला बृहत आराखडाचा मसुदा तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता नविन महाविद्यालय सुरू करण्या करिता तयार केलेला मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीसह विद्या परिषदेकडे विचारार्थ सादर करण्याची मंजूरी देण्यात आली.

The Hon'ble Vice-Chancellor has suggested to include the following points in the Perspective Plan : -

1) Considering the future challenges, perspective plan should be in line with the trend in the developed countries in terms of higher education system and accordingly emphasis be given more towards research angle slowly at the graduate level not only in the science but also in humanities and commerce through case studies. The case studies should be selected which has social relevance. The curriculum of all the programme be designed accordingly.

Scanned by CamScanner

2) Higher Education system should be blended with skill and knowledge. More emphasis be given on the internship/ summer placement and hands on training etc.

3) Taking into consideration of future freelance online worker, appropriate training component (even while learning too) be incorporated in the Perspective Plan to prepare the students as online worker in future.

4) To see that National Centre for Nano-science and Nano-technology be working with 100% strength.

5) As University has a long coastal area; courses like Oceanography, Marine sciences and other similar courses be devised with due consideration of natural resources in Ratnagiri, Vengurla, Sindhudurgh, Palghar through Sindhu Swadhyay.

6) To develop skill based courses in tribal area namely Dahanu and Palghar to increase employability.

7) School of Engineering including humanity and interdisciplinary studies etc. be started at Kalyan Sub-centre.

8) Courses related to Artificial Intelligence, needs to be started.

9) Distance Education needs to be expanded.

10) To concentrate on co-guide concept by collaborating at National and International level.

Scanned by CamScanner

बाब क्र.४ **Report of the Local Inquiry Committee for Temporary Shifting i.e. 36 months of National Center for Rural Development's Sterling College of Arts, Commerce & Science From "Plot No. 43, Sector -19, Nerul, Navi Mumbai-400 076" to "Plot No. 93, Sector -19, Nerul, Navi Mumbai-400 076".**

ठराव : After detailed discussion, it was resolved that the report of L.I.C. for temporary shifting of National Center for Rural Development's Sterling College of Arts, Commerce & Science From "Plot No. 43, Sector -19, Nerul, Navi Mumbai-400 076" to "Plot No. 93, Sector -19, Nerul, Navi Mumbai-400 076" for 36 months, be accepted, Subject to no dues certificate from Affiliation section.

Further, it was also resolved that the pending dues of college, if any, be verified by the Affiliation Section and submit no dues certificate within a month otherwise the college be directed to pay dues within a month, Permission for shifting be given after confirmation of payment of all dues, ~~and~~ The report of the same be submitted before the next Management Council Meeting.

बाब क्र.५ डॉ. जोस जॉर्ज यांना विद्यापीठ फंडातून देण्यात आलेल्या दोन वर्षांच्या वेतनाबाबत.

ठराव : After detailed discussion, it was resolved that a one man committee of Pro-Vice-Chancellor be constituted to examine the entire issue on the captioned matter noted above, after taking necessary legal assistance if needed and if possible the affected person be given hearing .

A report after constitution of committee be submitted within 15 days and pension paper work of Dr. Jorge Jose (Dr. Jose George) be processed as per rules.

Scanned by CamScanner

बाब क्र.७ **The matter of all temporary employees ( 1359 ) on Establishment of University of Mumbai whose period of temporary appointment is completing on 30th June , 2018.**

ठराव : It was resolved that fresh appointment orders be issued to 1359 temporary employees in the cadre of class-IV & III and technical specialized profession as from 3rd July, 2018 for a period of three months with due breaks in service as per rules.

Further, it was also resolved that a committee be constituted taking the help of the external experts of agency including internal experts to do the thorough work audit and to find out exact manpower requirements of all sections/departments. Hon'ble Vice-Chancellor be authorized to constitute the Committee. The report of the committee be submitted to the M.C. Hon'ble Vice-Chancellor be authorized to constitute the Committee.

It was also resolved that recruitment of existing temporary employees be made through outsourcing agencies.

The list of 1359 employees (age wise, court cases, other than court cases, department wise) be also submitted to the Management Council.

It was also resolved that the Task Force committee report be examined by the Establishment Section and implemented on top priority basis so that salary will be received from the State Govt.

बाब क्र.१४ **विद्यापीठसेवेत निवड करण्याकरिता व आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पदोन्नतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०२ (२) (e) नुसार विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहा पेक्षा अधिक नसतील अशा तज्ञांच्या नामिकेतून तीन विषयतज्ञ निवड समितीवर नामनिर्देशित करण्याबाबत**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०२ (2) (e) नुसार विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या तज्ज्ञांच्या नामिकेतून किमान ३ विषय तज्ज्ञ निवड समितीवर नामनिर्देशित करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत.

26.9.18



Scanned by CamScanner

बाब क्र.२२ विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याबाबत.

ठराव : पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २७९७/२०१५ वर दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयामुळे राज्यात सर्व स्तरातील शासकीय-निमशासकीय कार्यालयातील ठप्प झालेल्या प्रक्रियेबाबत महाराष्ट्र शासनाने सदर निर्णया विरोधात दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका प्रलंबीत असल्याने असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्रमांक. बी.सी.सी. -२०१७प्र.क्र.३१२A/१६-ब, २९ डिसेंबर, २०१७ अन्वये पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर तदर्थ पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवा ज्येष्ठतेनुसार, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व शासकीय आदेश/निर्णय व न्यायालयीन आदेश विचारात घेऊन पदोन्नत्या देण्यात याव्यात.

असाही ठराव करण्यात आला की, अनुदानित/विना-अनुदानित पदांवर कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचा-यांची यादी निश्चित नसल्याने एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमध्ये प्रवेशीत न झालेल्या शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनाच्या उद्भवलेल्या प्रश्नाबाबत तातडीने उपाय योजना करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कार्यबल गटाच्या (टास्क फोर्स) अहवालाच्या अधीन राहून स्थानापन्न स्वरूपात मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील ज्या कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आल्या आहेत व ज्यांचा ३/६ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आला होता, अशा कर्मचा-यांना/अधिका-यांना तदर्थ स्वरूपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सहा महिन्याकरिता पदोन्नती देण्यात यावी :-

१) ज्या कर्मचा-यांचा समावेश अनुदानित पदांवर करणे शक्य नाही अशा

Scanned by CamScanner

पात्र असलेल्या कर्मचा-यांना दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बाब क्र.८ वरील ठरावानुसार अन्य विना अनुदानित विभागात पदोन्नत करण्यात यावे. अशा कर्मचा-यांना विना अनुदानित कर्मचा-यांसाठी असलेल्या निवृत्ती वेतनाचा लाभ देण्यात यावा.

२) सदर पदोन्नत्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच शासन पत्र क्रमांक बी.सी.सी.-२०१७प्र.क्र.३१२A/१६-ब दिनांक २९ डिसेंबर, २०१७ नुसार केवळ तात्पुरत्या स्वरूपात असतील.

३) सदर पदोन्नत्या विद्यापीठाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१८-१९/८५७ दि. ९ जुलै २०१८ अन्वये शासनाकडून मागविण्यात आलेल्या मार्गदर्शनाच्या अधिन राहून असतील. सदर पदोन्नती DPC च्या अधिन राहून देण्यात यावेत. DPC स्थापन करण्याची प्रक्रिया यापुढे अवलंबण्यात यावी.

४) त्याचप्रमाणे रिक्त पदे भरण्यास बंदी असल्याने विद्यापीठाने प्रशासन सुरळीत चालविण्यासाठी सरळ सेवेच्या रिक्त पदांवर खुला व मागासवर्गीय प्रवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना स्थानापन्न स्वरूपात पदोन्नती देण्यात आल्या आहेत व ज्यांचा ३/६ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आला आहे त्यांना केवळ तात्पुरत्या स्वरूपात स्थानापन्न पदोन्नत्या देण्यात याव्यात.

५) सरळ सेवेच्या पदावर स्थानापन्न पदोन्नती केलेल्या कर्मचाऱ्यांना कोणतेही लाभ देय असणार नाहीत. ज्यावेळी पदोन्नतीच्या कोटयातील पदे रिक्त होतील त्योवळी प्रचलित नियमांचा विचार करून पदोन्नतीच्या कोटयावर त्यांच्या पदोन्नतीचा विचार करण्यात येईल व

Scanned by CamScanner

ज्या दिवशी रितसर पदोन्नतीच्या कोटयावर त्यांना पदोन्नत करण्यात येईल त्या दिवशी त्यांना त्या संवर्गातील जेष्ठता देण्यात येईल.

६) सरळ सेवेची पद सरळ सेवेनेच रितसर भरण्यात यावीत.

**बाब क्र.२३** **विद्यापीठातील विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यीत विभाग/संस्थांमध्ये आवश्यक असलेल्या अतिरिक्त पदांस मान्यता मिळणेबाबत.**

ठराव : सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील विनाअनुदानित स्वंयअर्थसहय्यीत विभागा/संस्थांमध्ये असलेली विद्यार्थी संख्या, कार्यभार आर्थिक व्यवहार्यता (financial feasibility), श्रीवास्तव समितीचा अहवाल विचारात घेऊन शिक्षकांची पदे निर्माण करण्यास तत्वत: मान्यता देण्यात यावी. तसेच सदर बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम ३७ (१) (m) नुसार अधिष्ठाता मंडळ व नंतर विद्वत परिषदेपुढे ठेवून व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी. श्रीवास्तव समितीचा अहवाल पटलावर ठेवण्यात यावा.

**बाब क्र.२४** **विद्यापीठातील अनुदानित विभागामध्ये अध्यापकांची तात्पुरती रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०३ (२) (f) नुसार व्यवस्थापन परिषदेने, नामनिर्देशित करावयाचा व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य किंवा प्राध्यापक.**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील विभागामध्ये अध्यापकांची तात्पुरती रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०३ (२) (f) नुसार स्थानिक निवड समितीवर प्रा. गौतम गवळी यांचे नामनिर्देशन करण्यात यावे.

**बाब क्र. २५** **To start the Master's and Micro Degree programmes in Data Science at University Department of Computer Science (UDCS) as a capacity building initiative under the tri-party collaboration of University of Mumbai, WIAI and Government of Maharashtra.**

Scanned by CamScanner

ठराव : It was resolved that permission be granted to start the Master's and Micro Degree programmes in Data Science in blended MOOC model at University Department of Computer Science (UDCS) as a capacity building initiative under the tri-partite collaboration of University of Mumbai, WIAI and Government of Maharashtra.

**उर्वरीत बाब क्र. २, ६, ८, ९, १०, ११, १२, १३, १५, १६, १७, १८, १९, २०, २१ व्यवस्थापन परिषदेच्या स्थगीत सभेमध्ये घेण्यात येतील.**

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करून अध्यक्षांच्या परवानगीने सभा दि. १४ जुलै, २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता स्थगित करण्यात आल्याचे कुलसचिवांनी घोषित केले.

SKSawant 09/08/18

सहायक कुलसचिव

10/08/18

कुलसचिव

31/08/18

प्र कुलगुरू

04/09/18

कुलगुरू

Minutes Confirmed.

26·9·18



Scanned by CamScanner